

कोल्हापूर : किर्लोस्कर वसुंधरा चित्रकला स्पर्धेत रविवारी चित्र रंगविण्यात दंग झालेले विद्यार्थी.

(बातमी पान ७ वर)

# वसुंधरा स्पर्धेत ६०० चित्रे

कोल्हापूर, ता. १४ : किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवांतर्गत झालेल्या चित्रकला स्पर्धेत शहरातील विविध शाळांच्या सहाशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. येथील राम गणेश गडकरी हॉलमध्येही स्पर्धा झाली.

**स्पर्धेतील विजेते** : पाचवी ते सहावी गट : सत्यजित दाभोळकर (स. म. लोहिया हायस्कूल), आदित्य पाटील (सेंट झेवियर्स), प्रतीक गोणे (वि. स. खांडेकर प्रशाला), सिद्धांत अडके, (सेंट झेवियर्स), आदित्य सुतार (साई इंग्लिश मीडियम स्कूल). **सातवी ते आठवी गट** : कौस्तुभ भोपळे (विद्यापीठ हायस्कूल), तेजस सुतार, (स. म. लोहिया हायस्कूल), सौरभ पाटील (काडसिद्धेश्वर हायस्कूल), वरुण चौगुले (सेंट झेवियर्स हायस्कूल), सौरवी कुरणे (होलीक्रॉस) **मूक-बधिर विद्यालय गट** : अभिजित जाधव, सर्फराज बागवान, आदेश रुकडीकर, विनय सुतार, प्रमोद रत्नाकर. **गतिमंद विद्यालय गट** : विशाल मोरे, आशीष सावेकर, शेखर वडणगेकर, दीपेश वाळके, ओंकार मोरे. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून सागर बगाडे व परीक्षक म्हणून एस. निंबाळकर, अभिषेक जोशी, नागेश हंकारे यांनी काम पाहिले. या स्पर्धेतील निवडक विजेत्यांच्या चित्रांचे प्रदर्शन १९ ते २१ या कालावधीत शाहू स्मारक भवनात भरविण्यात येणार आहे.

**आज नाट्य स्पर्धा**

वसुंधरा महोत्सवातील शालेय विद्यार्थ्यांची नाट्य स्पर्धा उद्या (ता. १५) राम गणेश गडकरी हॉलमध्ये होणार आहे. शिक्षण उपसंचालक एम. के. गोंधळी यांच्या हस्ते सकाळी नऊ वाजता उद्घाटन होणार आहे. यात वीस संघांनी सहभाग घेतला आहे.

* दैनिक सकाळ :- १५/०१/२०१८